# प्रस्तावना व विषय निवडीमागील भूमिका

तौलनिक साहित्याभास ही साहित्याच्या अभ्यासाची एक नवी शाखा आहे. तुलनात्मक संशोधनाची मुळ धारणा ही आहे की, साहित्याची अभिव्यक्ती भिन्न–भिन्न भाषांमध्ये भिन्न साहित्यप्रकारांमध्ये होत असते. दैनंदिन जीवनक्रमामध्ये आपली आवड नावड मुख्यत: उपलब्ध अगर ज्ञात विषयांच्या संदर्भातच असते. आपण कळत–नकळत कधी उघडपणे तर कधी मनातल्या मनात एका परीने तुलनाच करीत असतो व त्यातल्या त्यात उजवी वा बरी गोष्ट स्वीकारीत असतो. एका अर्थाने निवडलेली वस्तू उपलब्ध वस्तूंमध्ये तुलनेने श्रेष्ठ असल्याचेच आपण सांगत असतो. साहित्याच्या बाबतीतही असेच होते. दररोज इतके विपुल साहित्य निर्माण होत असते की, सर्वांचे वाचन एका व्यक्तीस शक्य नसते. आणि म्हणूनच असंख्य साहित्यिकांतून अथवा साहित्यकृतींमधून काही विशिष्ट साहित्यिक अथवा साहित्यकृतीच साहित्याच्या इतिहासामध्ये स्थान मिळवितात व इतरांचा केवळ उल्लेख मात्र होतो. उपलब्ध साहित्यकृतींमधून आपण तेव्हा विशिष्ट कृतीच निवडतो. तेव्हा त्या कृतीचा लेखक, त्यांची प्रतिष्ठा, कृतीचा विषय, भाषाशैली, समीक्षा, तिच्यातील वाङ्मयीन व जीवनमूल्ये इत्यादींचा साकल्याने विचार करीत असतो. आपण या सर्व गोष्टींवरच साहित्यकृतीचा दर्जा ठरवीत असतो.

एखाद्या साहित्यकृतीचे वेगळेपण लक्षात घ्यायचे असेल तर इतर साहित्यकृतीपेक्षा ती कशी व कित्ती वेगळी आहे हे तुलना करूनच ठरवावे लागते. निरनिराळ्या साहित्यकृतीतील साम्य शोधन व भेदनिदर्शन तुलनेनेच शक्य होते. एका साहित्यकृतीची दुसऱ्या साहित्यकृतीशी केलेली तुलना हे तुलनेचे मुळ रूप पण एका साहित्यकृतीची दोन किंवा अधिक लेखक, वाङ्मयप्रकार, वाङ्मयीन प्रवाह, परंपरा यांचा विचार केल्यास तुलनेचे क्षेत्र विस्तारत जाते.

तुलना हे साहित्याचे सर्वगामी व सर्वसंचारी साधन आहे. त्यामुळे साहित्याच्या अभ्यासात तुलनेचा वापर होतोच पण त्याची व्याप्ती पाहिली असता भिन्न भाषिक साहित्य आणि परंपरा आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा व्यापक संदर्भ लक्षात घेऊन त्याचा वापर केला जातो. आंतरविद्याशाखिय दृष्टीकोन, वाढत्या सांस्कृतिक संकरातून आलेला बहुसांस्कृतिकवाद झपाट्याने होणारे जागतिकीकरण, इंटरनेटचा वापर यामुळे वाङ्मयाकडे पाहण्याची तौलनिक दृष्टी विकसीत झाली आणि तिला तौलनिक साहित्याचे रूप आले.

तौलनिक साहित्यात वाङ्मयाचा संबंध सामाजिक व चरित्रात्मक परिस्थितीशी जोडला तरी चालतो. कारण कोणतेही वाङ्मय निर्वात पोकळीत वाढू शकत नाही. साहित्यकृतीतील संबंध शोधणे हे आपले ध्येय असले तरी तिच्यातील ऐतिहासिक व सौंदर्यशास्त्रीय पुरावा म्हणून नातेसंबंध शोधणे अधिक चांगले ठरते. शैलीशास्त्रीयदृष्टया अभ्यास तौलनिक साहित्यात व्हायला हवा. दोन लेखकांतील साम्यभेद शोधणे एका दृष्टीने फायद्याचे असते. मतप्रणाली, शैली, रचना एका अथवा दोन साहित्यातील कलाकृती आणि विशिष्ट किंवा निरनिराळ्या कालखंडातील असल्या तरी त्यांची सर्वांगिण तुलना आवश्यक ठरते. लेखकाच्या समग्र साहित्यकृतीची तुलना केल्यास विश्वसाहित्यातील काही चिरंतन

प्रमाणके निश्चित करता येतील. काही देश, समाज, तयार प्रभाव प्रक्षेपक किंवा स्थिकारक असतात. विशिष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात साहित्यकृतींची निर्मिती त्यांचे स्वागत स्वीकार यांच्या सांघिक आंतरविद्याशाखीय अभ्यास तौलनिक अभ्यासामध्ये केला जातो.

**''मंगेश पाडगांवकर आणि सुरेश भट यांच्या गझलांचा तुलनात्मक अभ्यास''** हा विषय एम्.फिल.च्या प्रबंधिकेसाठी निवडला. हा विषय ठरविताना मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शिका डॉ.सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली व विषय निश्चित केला.

प्रबंधिकेचा विषय निश्चित करताना त्यामध्ये आपली आवड असेल तर तो अभ्यास आपण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. गझलविषयी प्रत्येकाच्या मनात जिव्हाळा असतो. त्याबरोबर बऱ्याचवेळा टि.व्ही.वर, रेडिओवर सुरेश भट व मंगेश पाडगांवकर यांच्या गझला ऐकल्या होत्या. त्यामुळे वरील सर्व आवडीच्या संयोगाने प्रस्तुत प्रबंधिका विषय साकार झाला. माझी ही आवड माझ्या मार्गदर्शक प्राध्यापिका डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी यांनी बरोबर ओळखली. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत विषय मला सांगितला. त्याबरोबर मी देखील त्याला होकार दिला आणि या विषयात अभ्यास करण्याची संधी मिळाली. माझ्या कुवतीप्रमाणे हा विषय प्रबंधिकेद्वारे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

सुरेश भट व मंगेश पाडगांवकर हे कवी दोन वेगवेगळ्या संप्रदायातील आहेत. मंगेश पाडगांवकर हे माधव जूलियन संप्रदायातील आहेत. तर सुरेश भट हे नवे युग पुरूष म्हणून ओळखले जातात. त्यांनी मराठीमध्ये नूतन गझल युगाचा प्रारंभ केला. त्याचा विकास घडविण्यासाठीही ते ठामपणे उभे ठाकलेले आहेत. भटांच्या तुलनेने पाडगांवकरांनी लिहिलेल्या गझलांची संख्या कमी असली तरी त्यांच्या काही गझल भट संप्रदायातील गझलांशी तंतोतंत जुळतात. तर काही माधव संप्रदायातील गझलांशी जुळतात. सुरेश भट म्हटलं की आपणांस आठवते ती त्यांची गझल आणि निसर्गातून भावजीवन व्यक्त करणारे कवी म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर मंगेश पाडगांवकर येतात.

या दोन संप्रदायातील गझलकारांची गझल, तिची परंपरा, तिचे स्वरूप, मराठीतील गझलांचा परामर्श घेऊन गझलची वैशिष्टये कोणती? यांचा अभ्यास केला आहे.